

**Dr Kaustubh Dindorkar**
**M.B.B.S. M.S., M.Ch (Neurosurgery), DNB (Neurosurgery)**
**Phone** : 98222 512 79
**Email ID** : kaustubh32@rediffmail.com

# फिट्स

मेंदूमध्ये अचानकपणे निर्माण होणाऱ्या विद्युत रासायनिक प्रवाहामुळे फिट्स येतात. अशा प्रकारच्या फिट्स जर वारंवार येत असतील तर त्या रुग्णाच्या या आजाराला एपिलेप्सी (अपस्मार) असे म्हणतात.

'फीटचा आजार' असे नुसते शब्द उच्चारले तरी, त्या व्यक्तीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोनच बदलतो. लाज, शरम, कमीपणा, गैरसमज, अज्ञान, अंधश्रद्धा या सर्व भावना रुग्ण व त्यांच्या सुशिक्षित नातेवाईकांमध्येही आढळतात. या आजाराबद्दल असलेलया अज्ञानामुळे त्याला एक प्रकारचा (stigma) (तिरस्काराची भावना) जोडलेली आहे.

फीट' चा आजार समाजात सर्व वयोगटात व समाजाच्या सर्व थरांत पाहायला मिळतो. मेंदूतील पेशींमध्ये अचानक निर्माण होणाऱ्या विद्युत अविशामुळे फीट्स आजार होतो. या वेळी मेंदूतील रसायनांच्या पातळीत सुद्धा कमी-जास्तपणा उद्भवतो. मेंदूची रचना गुंतागुंतीची असल्याकारणाने वेगवेगळ्या प्रकारच्या फीट्स येऊ शकतात.

१. **जनरलाईज्ड टोनिक क्लोनिक किंवा ग्रॅंडमालः**
   मेंदूतील बिघाडामुळे निर्माण झालेला विद्युत रासायनिक प्रवाह जर संपूर्ण मेंदूत पसरला असेल तर या प्रकारची फीट येऊ शकते. अचानक हात पाय झाडणे, तोंडातून फेस येणे, दातखीळ बसणे, बेशुद्ध पडणे अशा प्रकारची लक्षणे दिसून येतात.

२. **कॉम्प्लेक्स पार्शलः**
   अशा प्रकारच्या फिट्स मध्ये रुग्णाची शुद्ध हरपण्याची शक्यता असते. शुद्ध हरपण्यापूर्वी तोंड वेडे वाकडे करणे, हाता-पायांची, चेहऱ्याची थरथर यांसारखी लक्षणे आढळून येतात.

३. **ॲबसेन्स किंवा पेटिटमाल** - अचानक शून्यात नजर लावणे, काही क्षणांसाठी बेशुद्ध पडणे व अशा प्रकारचे वारंवार (दिवसातून १० -३०) झटके येणे. साधारण ५- १५ वयोगटात.

४. **मायोक्लोनिक** - या प्रकारच्या फिट्स बालवयात तसेच पौंगंडावस्थेत येऊ शकतात.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilizing the information.*

*© Arogyadarpan.com*

अशा प्रकारे फीट्सचे अनेक प्रकार असू शकतात. सर्वात जास्त मदत ही फीट पाहण्याऱ्या जवळच्या व्यक्तीकडून मिळणाऱ्या माहितीतून होते व पेशंटला नक्की कोणत्या प्रकारची फीट येते, हे समजून येते. फीट्स हा आजार अनुवंशीक नाही.केवळ १५-२० टक्के फीट्स ह्या अनुवंशीक असतात.

**फिट्स ची कारणेः**

१. **लहान मुलांसाठीः**
   - मेंदूला वायूपुरवठा कमी झाल्यामुळे
   - मेंदूच्या रचनेत बिघाड झाल्यामुळे
   - ताप आल्यामुळे

२. **प्रौढांसाठीः**
   - जंतूसंसर्ग (Infection)
   - तरुणपणात (accident) डोक्याला मार लागणे
   - शीरांचे जाळे होणे (arterio venous malformation)
   - मेंदूतील गाठी (टयूमर)

**एखाद्या व्यक्तीस फीट आल्यास घ्यावयाची काळजीः**

- आजूबाजूची गर्दी कमी करुन रुग्णाचा श्र्वासोच्छ्वास ठीक आहे याची खात्री करणे.
- कपडे सैल करणे व चष्मा काढणे.
- आजूबाजूच्या कठीण/टोकदार वस्तू बाजूला सारणे
- रुग्ण कदाचित गोंधळलेल्या अवस्थेत असू शकतो त्याला धीर देणे.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilizing the information.*
*© Arogyadarpan.com*